




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25









अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४१ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १२/०६/२०२६ । पाने - ६







## संगमनेरातील सराईत गुन्हेगार एक वर्षासाठी स्थानबद्ध

### नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी कठोर पाऊल उचलत एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डेंजरस क्टिव्हिटीज) कायद्यांतर्गत एका सराईत गुन्हेगारास स्थानबद्ध केले आहे. राहुल भारत सोनवणे (वय २४, रा. अकोले नाका, संगमनेर) याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याची कारवाई करण्यात आली असून त्याची रवानगी नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे.

राहुल सोनवणे याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात मारहाण, लुटमार, जबरी चोरी, गंभीर दुखापत करणे यांसारख्या गंभीर स्वरूपाचे तब्बल १२ गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाया तसेच हद्दपार प्रस्तावाची कार्यवाही करण्यात आली होती. मात्र त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा होत नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. उलट त्याचे मनोबल वाढून भविष्यात आणखी गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

शहरातील शांतता व सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ नये यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, वाळू तस्कर, काळाबाजार करणारे, बेकायदेशीर जुगार व मानवी तस्करी करणाऱ्या व्यक्तींच्या विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी असलेल्या अधिनियम १९८१ (सुधारणा २०१८) च्या कलम ३(३) अन्वये धोकादायक व्यक्ती या सदराखाली त्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेला हा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे सादर करण्यात आला. आरोपीचा गुन्हेगारी इतिहास व संकलित माहिती तपासून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर (पान ४ वर)

## कर्जमाफी अटी - शर्ती विरोधात किसान सभेचे आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये अनेक जाचक अटी लावल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. सरकारने या जाचक अटी रद्द कराव्यात व शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा या मागणीसाठी आज किसान सभेच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात आले.

किसान सभेने काढलेल्या लाँग मार्चमध्ये देवस्थान जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना त्या जमिनीची मालकी देण्यासाठी कायदा करण्याचे मान्य करण्यात आले होते. राज्य सरकारने यासंदर्भात कायद्याचा मसुदा चर्चेसाठी नुकताच प्रकाशित केला होता. त्यावर हरकती मागण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र अतिहिंदुत्ववादी संघटनांनी दबाव आणल्यामुळे कायद्याचा हा प्रस्ताव स्थगित करण्यात आला असून त्यासंदर्भात शासनादेश काढण्यात आला आहे. ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून वर्षानुवर्ष देवस्थान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांवर हा मोठा अन्याय आहे. राज्यभर झालेल्या आंदोलनात याबाबत राज्य सरकारचा निषेध करण्यात आला असून कायदा बनवण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी व कायद्याच्या मसुद्यात शेतकरी हिताचे बदल करून हा कायदा मंजूर करावा अशी मागणी यासंदर्भात करण्यात आली आहे.

ठाणे पालघर, अहिल्यानगर, सांगली, बीड, नासिक, परभणी, कोल्हापूर, बुलढाणा, नांदेड, वर्धा इत्यादी २१ जिल्ह्यांमध्ये किसान सभेच्या नेतृत्वाखाली शासनाच्या आदेशाची होळी करून व तीव्र निदर्शने करून हे आंदोलन करण्यात आले. सन २०१९ मध्ये ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली त्यातील जे शेतकरी यावेळी पुन्हा कर्जमाफीसाठी पात्र झाले त्यांना या कर्जमाफीत केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार असून त्यातही त्यांना त्यांच्यावर असलेले उर्वरित कर्ज संपूर्णपणाने फेडण्याची अट टाकण्यात आली आहे. राज्यात अशा शेतकऱ्यांची संख्या सुमारे १२ लाख ७१ हजार आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या २३ लाख ७३ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले असून त्यांनी चार वेळा नजीकच्या काळात कर्ज भरले असल्याची अट टाकत केवळ ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदानावर त्यांना बोळवून घालण्यात आले आहे. इतरही अनेक जाचक अटी कर्जमाफीसाठी लावण्यात आल्या आहेत.

राज्य सरकार ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात या अटी शर्ती मुळे खूप कमी शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने कर्जमाफीचा लाभ होणार आहे. २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने सबंध महाराष्ट्रभर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्याची भरपाईही योग्यरित्या शेतकऱ्यांना देण्यात आली नव्हती. आता अशाप्रकारे अटी शर्ती लावल्यामुळे या शेतकऱ्यांना कर्जमाफीचाही पुरेसा लाभ मिळणार नाही. सरकारने या पार्श्वभूमीवर आपण लावलेल्या अटी शर्तीचा पुनर्विचार करावा. या अटी शर्ती काढून टाकाव्यात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते ते तंतोतंत पाळावे.

पीक कर्जा बरोबरच शेती अवजारांसाठी घेतलेले कर्ज, सिंचन सुविधांसाठी घेतलेले कर्ज, कुक्कुटपालन, इमूपालन, पॉलिहाऊस शेतकऱ्यांचे कर्ज इत्यादी शेती कर्जांचा समावेशही कर्जमाफीच्या योजनेत करावा. सोनेतारण व (पान ४ वर)

## ॲसिड हल्ला प्रकरणातील आरोपीला तातडीने अटक करा : डॉ. जयश्री थोरात



संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर - वडगाव पान येथील अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या सिड हल्ल्याला दोन महिने उलटूनही संबंधित आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध घेण्यात पोलिसांना यश आलेले नाही. या गंभीर प्रकरणात विशेष लक्ष घालून आरोपीस तातडीने अटक करावी आणि पीडित मुलीला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी एकविरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली.

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या समवेत कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन जिल्ह्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत, महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत तसेच संगमनेर तालुक्यातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, दीप चव्हाण, किरण पाटील, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे,सोमेश्वर दिवटे, रामहरी कातोरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

(पान ६ वर)

## होर्मुज खाडी बंद, तेल संकट आणखी वाढणार



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इराण आणि अमेरिका यांच्यात तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. होर्मुज जवळ इराणने आपले हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला. त्यानंतर अमेरिकेने मोठे हवाई हल्ले इराणवर केले. गेल्या दोन दिवसांपासून इराणवर मोठे हल्ले सुरू आहेत. इराणचे प्रमुख शहर अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. आम्ही अमेरिकेचे हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा खोटा असल्याचे सांगत इराणने म्हटले की, आम्ही काहीही झाले तरीही हार मानणार नाहीत. अमेरिकेला धडा शिकवण्यासाठी इराणने थेट होर्मुज खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला. आता होर्मुज खाडी पूर्णपणे बंद आहे. होर्मुज खाडीतून एकही जहाज येऊ शकत नाही. इराणने म्हटले की, जर कोणी होर्मुज खाडी पार करण्याची हिंमत केली तर थेट उडवून दिले जाईल. आता जगाची चिंता वाढली असून होर्मुज खाडी पूर्णपणे बंद आहे. होर्मुज खाडी पूर्णपणे बंद असणे ही भारतासाठी अत्यंत मोठी धोक्याची घंटा आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे जंग अस्थिरतेच्या संकटात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार दिलेल्या धमक्यांमुळे चिंता वाढली. या परिस्थितीबाबत भारतातील प्रमुख व्यापार आणि उद्योग संघटना असलेल्या चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने चिंता व्यक्त केली आहे. कारण याचा घातक परिणाम थेट भारतावर होईल.उद्यख चे अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी एक निवदेन जारी केले. त्यात त्यांनी म्हटले की, २० टक्के तेल याच मार्गाने येते. जर होर्मुज खाडी काही काळ बंद राहिली तर १९७० नंतरचे सर्वात मोठे ऊर्जा संकट येऊ शकते. पेट्रोल व डिझेलसह तेलाच्या किमतीत अचानक मोठी वाढ होऊ शकते. गेल्या काही दिवसांपासून जागतिक बाजारात सतत कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे.इराण आणि अमेरिका युद्धात होर्मुज खाडी कधीच पूर्णपणे बंद नव्हती.











Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 आजच संपर्क करा

24/7 Emergency Services

# फिफा विश्वचषक 2026 : फुटबॉलच्या नव्या युगाचा महासंग्राम

## मेस्सी-रोनाल्डोपासून एम्बापे-यमालपर्यंत सुपरस्टार्सची लढत

जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रीडा स्पर्धा म्हणून ओळखला जाणारा फिफा विश्वचषक २०२६ यंदा अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरत आहे. प्रथमच ४८ संघ, १०४ सामने आणि अमेरिका, कॅनडा व मेक्सिको या तीन देशांच्या संयुक्त यजमानपदामुळे हा विश्वचषक आतापर्यंतचा सर्वात मोठा ठरणार आहे. अब्जावधी प्रेक्षकांच्या नजरा या स्पर्धेकडे लागल्या असून, विश्वविजेता कोण होणार आणि गोल्डन बूटचा मान कोण पटकावणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. हा विश्वचषक केवळ ट्रॉफीसाठीची लढत नसून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेतृत्व हस्तांतरित होण्याचा क्षण मानला जात आहे.

विश्वचषकाचा इतिहास पाहिला तर युरोप आणि दक्षिण अमेरिका या दोन खंडांचेच वर्चस्व दिसून येते. ब्राझील, अर्जेंटिना, जर्मनी, इटली, फ्रान्स, स्पेन आणि इंग्लंड या संघांनी जागतिक फुटबॉलवर अधिराज्य गाजवले आहे. मात्र ४८ संघांच्या नवीन स्वरूपामुळे यंदा अनेक नवोदित संघांना मोठ्या मंचावर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे पारंपरिक बलाढ्य संघांना प्रत्येक सामन्यात अधिक सावध राहावे लागणार आहे.






**यंदाचे प्रमुख विजेतेपदाचे दावेदार**

**फ्रान्स -** किलियन एम्बापेच्या नेतृत्वाखाली अनुभव आणि युवा खेळाडूंचा उत्कृष्ट संगम.
**स्पेन -** लामिन यमालसारख्या प्रतिभावान युवा खेळाडूंमुळे सर्वाधिक संतुलित संघांपैकी एक.
**इंग्लंड -** हॅरी केन आणि ज्यूड बेलिंगहॅमच्या जोरावर १९६६ नंतरचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न.
**अर्जेंटिना -** गतविजेता संघ; मेस्सीच्या अनुभवासोबत तरुण खेळाडूंची मजबूत साथ.
**ब्राझील -** विनिसियस ज्युनियर, राफिन्हा यांसारख्या वेगवान आक्रमक खेळाडूंवर मोठी जबाबदारी.
**पोर्तुगाल -** ख्रिस्तियानो रोनाल्डोचा अनुभव आणि संतुलित संघरचना.
**जर्मनी -** मागील अपयश विसरून दमदार पुनरागमन करण्याची क्षमता.

गोल्डन बूटची रोमांचक शर्यत

विश्वचषकाइतकीच चर्चा होते ती सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला दिल्या जाणाऱ्या **'गोल्डन बूट'** पुरस्काराची. यंदा ही शर्यत अत्यंत चुरशीची असणार आहे.

**गोल्डन बुट प्रमुख दावेदार**

- **किलियन एम्बापे (फ्रान्स) -** स्फोटक वेग आणि अचूक फिनिशिंग.
- **हॅरी केन (इंग्लंड) -** सातत्यपूर्ण गोलस्कोरर.
- **लिओनेल मेस्सी (अर्जेंटिना) -** अनुभव, सर्जनशीलता आणि मोठ्या सामन्यांतील प्रभाव.
- **ख्रिस्तियानो रोनाल्डो (पोर्तुगाल) -** विक्रमांचा बादशाह आणि निर्णायक क्षणांचा खेळाडू.
- **इर्लिंग हॅलांड (नॉर्वे) -** जगातील सर्वात घातक स्ट्रायकर्सपैकी एक.
- **लामिन यमाल (स्पेन) -** फुटबॉलच्या नव्या पिढीचा सर्वात मोठा चेहरा.
- **विनिसियस ज्युनियर (ब्राझील) -** वेगवान आणि सर्जनशील आक्रमक.

**मेस्सी-रोनाल्डोचा अखेरचा विश्वमंच?**

गेली जवळपास दोन दशके जागतिक फुटबॉलवर लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांचे वर्चस्व राहिले आहे. लाखो चाहत्यांसाठी हे दोघे केवळ खेळाडू नसून भावना आहेत. त्यामुळे २०२६ चा विश्वचषक त्यांच्या कारकिर्दीतील अखेरचा विश्वचषक ठरू शकतो, अशी चर्चा आहे. दुसरीकडे एम्बापे, यमाल आणि हॅलांड यांसारखे युवा खेळाडू जागतिक फुटबॉलच्या नव्या युगाची घोषणा करण्यास सज्ज आहेत.


**हवामान ठरवू शकते निकाल**

यंदाची स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये होत असल्याने काही मैदानांवर उष्णता आणि दमट वातावरणाचे मोठे आव्हान असू शकते. सलग सामने, लांबचा प्रवास आणि बदलते हवामान यामुळे खेळाडूंच्या फिटनेसची मोठी परीक्षा होणार आहे. आधुनिक फुटबॉलमध्ये वेग आणि उच्च तीव्रतेचा खेळ महत्त्वाचा असल्याने प्रशिक्षकांना खेळाडूंचे रोटेशन आणि रणनीती अत्यंत काळजीपूर्वक आखावी लागणार आहे.


**यंदाच्या विश्वचषकातील लक्षवेधी बाबी**

- प्रथमच ४८ संघांचा सहभाग
- एकूण १०४ सामने
- तीन देशांचे संयुक्त यजमानपद
- अनेक युवा सुपरस्टार्सचा पहिला मोठा विश्वचषक
- गोल्डन बूटसाठी दिग्गजांमध्ये थेट लढत
- आधुनिक तंत्रज्ञान आणि व्हिडिओ रेफरी प्रणालीचा व्यापक वापर
- फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या व्यावसायिक स्पर्धांपैकी एक

फिफा विश्वचषक २०२६ हा केवळ फुटबॉलचा उत्सव नाही, तर इतिहास, भावना, तंत्रज्ञान आणि भविष्य यांचा संगम आहे. एकीकडे मेस्सी आणि रोनाल्डोसारख्या दंतकथांच्या कारकिर्दीचा सुवर्णअध्याय पूर्ण होण्याची शक्यता आहे, तर दुसरीकडे एम्बापे, यमाल आणि हॅलांडसारखी नवी पिढी जागतिक फुटबॉलचे नेतृत्व स्वीकारण्यासाठी सज्ज आहे. अखेरीस ट्रॉफी एका संघाच्या हाती जाईल, पण पुढील अनेक वर्षे लक्षात राहील ती या महासंग्रामातील खेळ, रोमांच आणि नव्या इतिहासाची निर्मिती.



# साने गुरुजींचा
## ७६ वा स्मृतीदिन



साने गुरुजी म्हटले की, धोतर-सदरा घातलेल्या साध्या, भोळ्या शाळामास्तरांची प्रतिमा समोर येते; पण ही प्रतिमा अपूर्ण आहे. साने गुरुजींनी शंभर वर्षांपूर्वी एम.ए. ही पदवी प्राप्त केली होती. त्याकाळात ही पदवी सहजसाध्य नव्हती. या पदवीच्या जोरावर त्यांना मोठ्या अधिकारपदाची नोकरी सहज मिळाली असती; पण त्याकडे पाठ फिरवून त्यांनी शिक्षक होणे पसंत केले. साने गुरुजी प्रकांड पंडित होते, क्रांतिकारक होते.


साने गुरुजींचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. आयुष्यभर अज्ञान, विषमता आणि पारतंत्र्य यांच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या गुरुजींनी ११ जून १९५० रोजी स्वतःला मृत्यूच्या स्वाधीन केले.

साने गुरुजी क्रांतिकारक होते, साने गुरुजी लढवय्ये होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पदर होते; पण त्यांचे व्यक्तिमत्त्व रणझुंजार असताना करुणा, वात्सल्य, नम्रता आणि प्रेम यांच्या चौकटीत गुरुजींची प्रतिमा बंदिस्त करण्यात येथील व्यवस्थापित यंत्रणा यशस्वी झाली.

साने गुरुजी म्हटले की, सगळ्यात अगोदर समोर येते ती म्हणजे श्यामची आई. याच श्यामची आईमुळे साने गुरुजींची प्रतिमा मातृहृदयी अशी निर्माण झाली. आजही मराठी सारस्वतात श्यामची आई हेच सर्वाधिक लोकांनी वाचलेले पुस्तक आहे. आचार्य अत्रे यांनी १९५२ साली श्यामची आई हा चित्रपट काढला. तो तुफान लोकप्रिय झाला. त्याला भारतातील पहिला सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. अत्रेंनी साने गुरुजींना मातृप्रेमाचे मंगलस्तोत्र असे संबोधले आणि महाराष्ट्राच्या जनसामान्यांमध्ये ही प्रतिमा घट्ट रुजली. ही प्रतिमा काही अंशी खरी असली तरी आम्ही राष्ट्र सेवा दलाचे सैनिक स्वतःला साने गुरुजींचे धडपडणारे लेकरू म्हणवून घेतो, ते केवळ साने गुरुजी मातृहृदयी आहेत म्हणून नव्हे; तर त्यांच्या जीवनाचे इतरही अनेक पैलू आहेत आणि ते पैलू अधिक प्रभावी आहेत. त्यांचा आमच्यावर प्रभाव आहे.

पदवी प्राप्त केल्यावर गुरुजी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी अंमळनेरला गेले. तो मध्येच सोडून देऊन ते शिक्षक बनले. अंमळनेरच्या शाळेतील विद्यार्थ्यांशी एकरूप झाले. त्याचवेळी त्यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव पडला. १९३० साली त्यांनी शिक्षकी पेशाचा त्याग केला आणि स्वतःला महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळीत झोकून दिले.

महात्मा गांधींनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आदेश दिला, खेड्याकडे चला. त्यासाठी १९३६ साली काँग्रेसचे अधिवेशन देशात प्रथमच खान्देशातील







फैजपूरसारख्या खेड्यात घेण्याचे निश्चित झाले. साने गुरुजींनी या अधिवेशनाला शेतकरी वर्ग अधिकाधिक हजर राहावा यासाठी खेडोपाडी फिरून अधिवेशनाचा प्रचार केला.

आता उठवू सारे रान,
आता पेटवू सारे रान,
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी
लावू पणाला प्राण.

हे गीत त्यांनी रचले. गावोगावी हे गीत शेतकऱ्यांच्या मुखोद्गत झाले. हे गीत आजही लोकप्रिय आहे. शेतकरी संघटनांच्या आंदोलनाचे ते प्रेरणागीत बनले. गुरुजींची स्वातंत्र्यसैनिक म्हणून असलेली ओळख समाजाला फारशी परिचित नाही.

गुरुजींना स्वातंत्र्य आंदोलनात अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगवासात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली तसेच देशातील व परदेशातील अनेक मान्यवर लेखकांच्या पुस्तकांचे मराठीत अनुवाद केले. गुरुजींना मराठीशिवाय तमिळ, इंग्रजी, संस्कृत, उर्दू इत्यादी भाषांचे ज्ञान होते. ते बहुभाषिक होते. त्यांनी आंतरभारती ही संकल्पना राबवून सर्व भाषिक लोकांमध्ये सलोखा, संवाद आणि संपर्क वाढावा असा प्रयत्न केला. जगातील अनेक संस्कृती आणि धर्मांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. त्यावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. अनेक देशांचा इतिहासही त्यांना ज्ञात होता.





धर्म, साहित्य, संस्कृती आणि इतिहास यांचे अभ्यासक ही त्यांची ओळख फार थोड्यांना ज्ञात आहे.

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.

मराठीत अजरामर झालेली ही प्रार्थना गुरुजींनी महाराष्ट्राला दिलेली अतिशय मोठी देणगी आहे. धर्माचा अर्थ एवढा सोपा आणि सुलभ करून सांगणारी दुसरी कोणतीही प्रार्थना नाही.

१९४२ मध्ये महात्मा गांधींनी इंग्रजांना चले जावचा इशारा दिला. भारताच्या स्वातंत्र्यासाठी करेंगे या मरेंगेचा निर्धार करण्यात आला. इंग्रजांनी महात्मा गांधी आणि काँग्रेस नेत्यांना अटक केली. साने गुरुजी भूमिगत झाले. भूमिगत राहून त्यांनी







इंग्रज सरकारविरोधात क्रांतिकारक कारवाया सुरू केल्या. सरकारविरोधात क्रांतीचे रणशिंग फुंकले. क्रांतिकारक विचारांचा प्रसार केला. अनेक बुलेटिनमधून ब्रिटिश सरकार उलथून लावण्यासाठी जे प्रयत्न सुरू होते, त्यात जनतेने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. गुरुजी क्रांतिकारक होते; परंतु त्यांची ही प्रतिमा महाराष्ट्रापुढे आम्ही नेण्यात कमी पडलो.

पंढरपूरच्या पांडुरंगाचे (विठ्ठल) दर्शन सर्व जातीधर्मांसाठी खुले नव्हते. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. पंढरीचा पांडुरंग सर्वांचा आहे आणि मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश दिला पाहिजे, या मागणीसाठी पांडुरंग सदाशिव साने गुरुजी पंढरपुरात आमरण उपोषणास बसले. एका पांडुरंगाच्या उपोषणाने दुसरा पांडुरंग १० मे १९४८ रोजी सर्वांसाठी खुला झाला. अस्पृश्यता विरोधी गुरुजींचा हा संघर्ष महाराष्ट्राला नवी दिशा देऊन गेला. अस्पृश्यता निर्मूलन कार्यक्रमात पुरोगामी महाराष्ट्र आघाडीवर राहिला. गुरुजींचे हे समाजसुधारक म्हणून केलेले कार्य खूप मोठे असूनही समाजसुधारकांच्या यादीत त्यांचे नाव फारसे दिसत नाही.

१९४८ मध्ये गुरुजींनी साधना साप्ताहिक सुरू केले. ते त्याचे संपादक होते. साधनाच्या माध्यमातून त्यांनी केलेली पत्रकारिता आजही दुर्लक्षित आहे.

गुरुजी म्हणत, राष्ट्र सेवा दल हा माझा प्राणवायू आहे. आपण जर स्वतःला साने गुरुजींचे धडपडणारे लेकरू समजत असू, तर आज देशात चालू असलेल्या धार्मिक विसंवाद आणि बेबनावाच्या विरोधात ठामपणे उभे राहावे लागेल. सर्व जगात बहुसंख्यांकवाद बोकाळत आहे; त्याला रोखण्याचे काम आपल्याला करावे लागेल. गरीब, शोषित माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहावे लागेल.

जगी जे आर्त अति पतित,
जगी जे दीन पददलित,
तया जाऊन उठवावे,
जगाला प्रेम अर्पावे.
हे काम आपल्याला करायचे आहे.

साने गुरुजींनी बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो हे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न आपल्याला पूर्ण करायचे आहे. हे स्वप्न पूर्ण करणे हेच त्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# यशोधनच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांसाठी 300 ट्रान्सफॉर्मर



### तक्रारी व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी यशोधन कटिबद्ध

**लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी यशोधन कार्यालयाच्या माध्यमातून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून त्यांचे प्रश्न तात्काळ सोडवले जातात. विविध गावांमधील शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीवरून त्यांचे जळालेले ट्रान्सफॉर्मर वीज वितरण विभागाच्या सहकार्याने नव्याने बसवण्यात आल्याने शेतकऱ्यांना नक्की दिलासा मिळणार आहे.**

**- डॉ जयश्री थोरात**
**संगमनेर तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष**

युवावार्ता (प्रतिनिधी)-
संगमनेर -महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते राज्याचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील जळालेल्या ३०० ट्रांसफार्मरच्या ठिकाणी नव्याने ३०० ट्रांसफार्मर विविध गावांमध्ये बसवण्यात आले आहे.

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून १७१ गावे व २५८ वाड्या वाचल्या आहेत. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात विद्युतीकरणाचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. मागील काही महिन्यातील वाढलेली उष्णता यामुळे शेती व घरगुती वापरासाठी विजेचा जास्त प्रमाणात वापर झाला. अनेक ठिकाणी ट्रांसफार्मर जळाल्याने शेतकऱ्यांनी यशोधन कार्यालयाकडे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्याकरता सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून शेतकऱ्यांना हा दिलासा मिळाला आहे

कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात व इंद्रजीत भाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन कार्यालयात तालुक्यातील नागरिकांच्या विजेच्या समस्या सोडवण्यासाठी मागील दहा वर्षापासून स्वतंत्र कक्ष कार्यरत आहे. त्या माध्यमातून तालुक्यातील नागरिकांच्या विजेबाबतच्या अडचणी सातत्याने सोडवल्या जातात.

यशोधन कार्यालयाच्या वतीने आलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत त्यांच्या जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या ठिकाणी नव्याने ट्रान्सफॉर्मर मिळावा याकरता शासनाच्या वीज वितरण विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला. या माध्यमातून तालुक्यात ३०० नवीन ६३ केव्ही व १०० केव्हीचे ट्रांसफार्मर बसवण्यात आले. यामध्ये तळेगाव, साकुर, वडगाव पान, जोर्वे धांदरफळ, आश्वी, घुलेवाडी, समनापुर गटामधील विविध गावांमध्ये बसवण्यात आले आहे. वीज पुरवठा नियमित व सुरळीत व्हावा याकरता या ट्रांसफार्मरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठी मदत होत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. लोहारे येथील कदम , अभंग व पवार वस्ती येथे या योजनेअंतर्गत १०० केव्ही ट्रांसफार्मर उपलब्ध करून देण्यात आला.

# महसूल सहाय्यकासह कंत्राटी कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडले

युवावार्ता (प्रतिनिधी)
अहिल्यानगर - राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या नुकसानभरपाईची रक्कम मंजूर करून देण्यासाठी एक लाख गितल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि एका कंत्राटी कर्मचार्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

यामध्ये महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे (सध्या नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर) आणि कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर (उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्रीगोंदा-पारनेर विभाग) यांचा समावेश आहे.

तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची मौजे जंगलेवाडी (ता. श्रीगोंदा) येथील १४३ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डीवरील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पासाठी शासनाने संपादित केली होती. या भूसंपादनाच्या बदल्यात तक्रारदारांना अतिम व पुरवणी अवॉर्डनुसार सुमारे १ कोटी ४७ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली होती. मात्र, या रकमेतील प्रलंबित निधी मिळण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. (फंड ट्रान्स्फर ऑर्डर) मंजूर करून देण्याच्या प्रक्रियेत संशयित आरोपींनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संशयितांनी वेळोवेळी पैशांची मागणी केली होती. तसेच ४ मे २०२६ रोजी महसूल सहाय्यक मंगेश ढुमणे याने व्हॉट्सअॅप कॉलव्दारे तक्रारदारांशी संपर्क साधून एक लाख २० हजार रुपयांची मागणी केली. पैसे दिल्यास एफ.टी.ओ. तात्काळ मिळेल आणि मंजुरीसाठी वरिष्ठ अधिकार्यांनाही पैसे द्यावे लागतील, असे संशयिताने सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

या तक्रारीची गंभीर दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ६ मे रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली. या पडताळणीत मंगेश ढुमणे आणि अमोल खामकर यांनी तक्रारदारांची नुकसानभरपाईची रक्कम मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. मंजुरी मिळवून देण्याच्या मोबदल्यात १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्यास सहमती दर्शविल्याचे स्पष्ट झाल्याची माहिती एसीबीने दिली.

# मंडपाचे पैसे मागितल्याने मारहाण
## बोटा परीसरातील १४ जणांवर गुन्हा दाखल




युवावार्ता (प्रतिनिधी)
घारगाव- शिवजयंतीनिमित्त उभारलेल्या मंडपाचे थकीत पैसे मागितल्याच्या कारणावरून संगमनेर तालुक्यातील कुरकुटेवाडी (बोटा) येथे एकाच कुटुंबातील चौघांना लोखंडी गज, लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गावातील १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकाश कुरकुटे हे शेती व मंडप व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गावातील शिवजयंती समितीकडे त्यांच्या मंडप व्यवसायाचे १५ हजार रुपये थकीत होते.

तीन दिवसांपूर्वी समीतीचे काही सदस्य रायगड येथे सहलीसाठी जात असल्याचे पाहून आकाश यांनी, सहलीसाठी पैसे आहेत, मग माझे थकीत पैसे देण्यासाठी का नाहीत? अशी विचारणा केली होती. या प्रश्नाचा राग मनात धरून संबंधितांनी त्यांना परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर सोमवार (दि. ८ जून) रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सर्व आरोपी बेकायदेशीर जमाव करून आकाश कुरकुटे यांच्या घरासमोर आले. तु आमची बदनीमी का करतोस? आम्ही तुझे पैसे बुडवले आहेत का? असे म्हणत त्यांनी शिवीगाळ व दमदाटी करण्यास सुरुवात केली.

वाद वाढल्यानंतर आरोपी नवनाथ केरुभाऊ कुरकुटे याने हातातील लोखंडी गजाने आकाश यांच्या पाठीवर जोरदार प्रहार केला. हा प्रकार सुरू असताना आकाश यांचे भाऊ संतोष, भावजयी जयश्री तसेच पुतणे सिद्धी आणि उत्कर्ष हे वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्यास आले. मात्र, आरोपींनी त्यांनाही मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी घारगाव पोलिसांनी सार्थक उल्हास कुरकुटे, विनोद राजेंद्र कुरकुटे, ओंकार हरिश्चंद्र कुरकुटे, सोमनाथ भास्कर कुरकुटे, तेजस बबन कुरकुटे, सागर बबन कुरकुटे, वसंत दशरथ कुरकुटे, यश सोमनाथ कुरकुटे, प्रतिक सोमनाथ कुरकुटे, नवनाथ केरुभाऊ कुरकुटे, संगीता नवनाथ कुरकुटे, अमृता उल्हास कुरकुटे, पुनम हरिश्चंद्र कुरकुटे आणि आशा राजेंद्र कुरकुटे (सर्व रा. कुरकुटेवाडी, बोटा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास घारगाव पोलिस करत आहेत.

# अगस्ती महाराज यांनी दक्षिणेतील पहिला आश्रम अकोल्यात स्थापन केला - गोविंदगिरी महाराज

युवावार्ता ( प्रतिनिधी)
अकोले - अकोल्याची भूमी असामान्य असून दक्षिणेतील पहिला आश्रम येथे स्थापन केला. या आश्रमात त्यांनी प्रभू श्रीराम यांना शस्त्र आगर दाखवले, रावणाला मारण्यासाठी बाण दिला. राक्षसांचा विनाश करण्यात या आश्रमाचे महत्व आहे. असे प्रतिपादन श्रीराम मंदिर ट्रस्ट अयोध्याचे कोषाध्यक्ष स्वामी गुरु गोविंद गिरीजी महाराज यांनी केले.

अकोले येथील अगस्ती आश्रमात पुरुषोत्तम अधिक मास निमित्ताने महिनाभर अखंड कीर्तनमोहत्सव आयोजित करण्यात आला यामध्ये गोविंदगिरीजी महाराज बोलत होते. यावेळी आमदार किरण लहामटे, अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अॅड. के. डी. धुमाळ, प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्तर नगर जिल्हा कार्यवाह दिपक जोंधळे आदी उपस्थित होते. भारत राष्ट्र हे धर्माच्या आधारावर आधारित राष्ट्र असून सनातन धर्माचा पाया आपला देश आहे. सनातन धर्म समानतेचा आहे. याच्यासाठी आपण जीवन समर्पित करावे. इच्छा शक्ती असेल तर प्रभू श्रीराम यांचे मंदिर भव्य दिव्य उभारण्यात आले. अगस्ती महाराज यांचे दहा



पुत्र राक्षसांनी मारले यामुळे त्यांचा विनाश करण्याचे नियोजन केले. यासाठी अनेक आश्रम स्थापन केले. अकोलेत अगस्ती महाराज लोपमुद्रा मातेसह राहिले यामुळे ही भूमी पवित्र आहे. आदित्य स्तोत्राची निर्मिती केली त्याचा महिमा आजही आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले.

अमृतवाहिनी प्रवरा माता ही अत्यंत पवित्र असून तिच्या तीरावर अकोल्यात अगस्ती आश्रम व नेवासा येथे ज्ञानेश्वरीचे लिखाण झाले आहे. गोदावरी स्नान व प्रवरा पान म्हणजे प्रवरा नदीचे पाणी पिणे कारण ते शुद्ध असून औषधी जल आहे अशीही माहिती दिली. प्रवरेच्या तीरावरील आपण सर्व बंधू आहोत. असेही महाराज यांनी म्हटले. अकोले मतदारसंघाचे आमदार किरण लहामटे यांनी मला मनाला समाधान मिळावे यासाठी मी आठवड्यातून दोन तीन वेळा दर्शनासाठी येतो. अगस्ती देवस्थानचा विकास करण्यासाठी सर्वोत्परी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष अॅड. के. डी. धुमाळ यांनी प्रभू श्रीराम कॉरिडॉर मध्ये अगस्ती देवस्थानचा चा समावेश करून देवस्थान चा विकास करावा यासाठी गुरू गोविंद गिरीजी महाराज यांनी प्रयत्न करावे अशी मागणी केली.

अयोध्येतील प्रभू श्रीराम यांचे मंदिरात अगस्ती महाराज यांची मूर्ती बसवली तिची प्रतिकृती अकोले आश्रमातील मूर्तीसारखी गुरू गोविंदगिरीजी महाराज यांनी बनवली. हा अगस्ती आश्रमाचा गौरव आहे असे मत दिपक महाराज देशमुख यांनी व्यक्त केले. प्रवरा पुलावर प्रवरा मातेचे पूजन करण्यात आली. अगस्ती महाराज गुरुकुल च्या विद्यार्थ्यांनी संकेत महाराज आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढली.

# KM HOSPITAL संगमनेरकरांसाठी आधुनिक आरोग्यसेवेचे विश्वासार्ह केंद्र

आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीची सर्वात मोठी संपत्ती आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे, वाढत्या ताणतणावामुळे आणि विविध आजारांच्या वाढत्या प्रमाणामुळे दर्जेदार वैद्यकीय सेवांची गरज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. अशा परिस्थितीत संगमनेर परिसरातील नागरिकांसाठी अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारे के.एम. हॉस्पिटल हे एक विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा केंद्र म्हणून उदयास आले आहे. के.एम. हॉस्पिटलने रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि आधुनिक सुविधा यांचा संगम घडवून आणला आहे. रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज भासू नये, यासाठी विविध वैद्यकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या रुग्णालयाने केला आहे.



या रुग्णालयात सुमारे १०५ बेड्सची सुविधा उपलब्ध असून, गंभीर तसेच सामान्य रुग्णांच्या उपचारासाठी सर्व आवश्यक यंत्रणा सज्ज आहे. रुग्णांच्या गरजेनुसार स्वतंत्र विभागांची उभारणी करण्यात आली आहे. अनुभवी आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक रुग्णाला वैयक्तिक लक्ष देण्यात येते. त्यामुळे रुग्णांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

के.एम. हॉस्पिटलमध्ये हृदयविकार विभाग अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. हृदयाशी संबंधित विविध आजारांचे निदान आणि उपचार येथे केले जातात. तसेच समर्पित स्त्रीरोग विभाग महिलांच्या आरोग्यविषयक सर्व समस्यांवर तज्ज्ञ मार्गदर्शन आणि उपचार उपलब्ध करून देतो. गर्भधारणा, प्रसूती आणि इतर स्त्रीरोगांवरील उपचार अत्यंत काळजीपूर्वक केले जातात.

रुग्णालयात अस्थिरोग विभाग देखील कार्यरत असून हाडे, सांधे आणि स्नायूंशी संबंधित समस्यांवर आधुनिक उपचारपद्धतींचा वापर केला जातो. याशिवाय अपघात विभाग चोवीस तास कार्यरत असून आपत्कालीन परिस्थितीत तातडीची वैद्यकीय मदत दिली जाते. अपघातग्रस्त रुग्णांसाठी आवश्यक असलेली सर्व साधनसामग्री आणि प्रशिक्षित कर्मचारी येथे उपलब्ध आहेत.

मूत्रपिंडाशी संबंधित आजारांसाठी मूत्रविकार विभाग विशेष सेवा देतो. तसेच सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅप्रोस्कोपिक सर्जरी, युरोलॉजी उपचार आणि जनरल मेडिसिन यांसारख्या विविध शाखांमध्ये तज्ज्ञ सेवा दिली जाते. यामुळे रुग्णांना एकाच ठिकाणी विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचार मिळतात. के.एम. हॉस्पिटलची आणखी एक महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण सेवा म्हणजे छातीचे विकार आणि पल्मोनरी मेडिसिन विभाग. श्वसनसंस्थेशी संबंधित विविध आजारांचे अचूक निदान आणि उपचार येथे केले जातात. तसेच पल्मोनरी फंक्शन चाचणी, एन्डोस्कोपिक स्पाईन सर्जरी, रोबोटिक सर्जरी यांसारख्या आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले जातात.

गंभीर रुग्णांसाठी अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, डायलिसिस युनिट, प्लास्टिक सर्जरी, सीटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे निदानापासून उपचारांपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया एकाच ठिकाणी सुलभ होते. अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे अचूक निदान व प्रभावी उपचार शक्य होतात.

रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आणि तातडीच्या सेवांसाठी २४७ इमर्जन्सी सेवा कार्यरत आहे. दिवस असो किंवा रात्र, कोणत्याही वेळी वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासल्यास प्रशिक्षित डॉक्टर आणि कर्मचारी तत्परतेने सेवा देतात. आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते आणि के.एम. हॉस्पिटल ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत आहे.

सामाजिक बांधिलकी जपत हे रुग्णालय आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत देखील सेवा उपलब्ध करून देते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही दर्जेदार उपचार सहज उपलब्ध होतात. आरोग्यसेवा ही केवळ सुविधा नसून प्रत्येकाचा अधिकार आहे, या विचाराला अनुसरून रुग्णालय कार्यरत आहे.

संगमनेर आणि परिसरातील नागरिकांसाठी के.एम. हॉस्पिटल हे केवळ एक रुग्णालय नसून आरोग्याचा विश्वासार्ह साथीदार बनले आहे. आधुनिक सुविधा, अनुभवी डॉक्टर, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णकेंद्रित सेवा यामुळे या रुग्णालयाने अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात उत्तम आरोग्य हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. अशा वेळी प्रत्येक नागरिकाला वेळेवर, दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळणे आवश्यक आहे. के.एम. हॉस्पिटलने ही गरज ओळखून संगमनेर परिसरातील नागरिकांसाठी आधुनिक आरोग्यसेवेचे सक्षम आणि विश्वासार्ह केंद्र उभे केले आहे. आरोग्यसेवेतील गुणवत्ता, विश्वास आणि मानवतेचा संगम असलेले के.एम. हॉस्पिटल भविष्यातही समाजसेवेचे हे कार्य अधिक व्यापकपणे करत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करावी लागेल.

# संपादकीय...

## स्वच्छ इंधनाच्या शर्यतीत भारताची दमदार उपस्थिती

भारतासह संपूर्ण जग सध्या ऊर्जा, पर्यावरण आणि विकास या तिन्ही क्षेत्रांतील मोठ्या आव्हानांना सामोरे जात आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे ऊर्जेची मागणी झपाट्याने वाढत आहे. दुसरीकडे, पारंपरिक जीवाश्म इंधनांच्या अतिवापरामुळे पर्यावरणीय संकट अधिक गंभीर बनले आहे. हवामान बदल, वाढते जागतिक तापमान, दुष्काळ, पूर आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत असताना स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेचा शोध ही काळाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत 'ग्रीन हायड्रोजन' हा पर्याय जगभरातील धोरणकर्ते, शास्त्रज्ञ आणि उद्योगक्षेत्रासाठी आशेचा किरण ठरत आहे. अलीकडेच आयआयटी गुवाहाटीच्या संशोधकांनी ग्रीन हायड्रोजन निर्मिती अधिक प्रभावी बनविणारे तंत्रज्ञान विकसित करून भारताच्या ऊर्जा क्षेत्रात नवी आशा निर्माण केली आहे. हायड्रोजन हे विश्वातील सर्वाधिक उपलब्ध असलेले मूलद्रव्य असले तरी ते स्वतंत्र स्वरूपात सहज उपलब्ध होत नाही. पाण्याचे विघटन करून हायड्रोजन मिळविण्याची प्रक्रिया अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जा लागते. जर ही ऊर्जा सौर किंवा पवन ऊर्जेसारख्या नवीकरणक्षम स्त्रोतांमधून मिळाली, तर तयार होणाऱ्या हायड्रोजनला 'ग्रीन हायड्रोजन' म्हटले जाते. या प्रक्रियेत कार्बन उत्सर्जन होत नसल्याने ते पर्यावरणासाठी सुरक्षित मानले जाते. त्यामुळे भविष्यातील स्वच्छ ऊर्जा व्यवस्थेचा हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकतो. आज जगातील बहुतांश अर्थव्यवस्था तेल, कोळसा आणि नैसर्गिक वायूवर अवलंबून आहेत. गेल्या दोन शतकांतील आर्थिक प्रगतीचा पाया याच इंधनांवर उभा राहिला; परंतु त्याचबरोबर पर्यावरणीय संकटाची किंमतही जगाला मोजावी लागत आहे. हवामान बदलाचे परिणाम आता केवळ वैज्ञानिक अहवालांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. वाढती उष्णतेची लाट, अवकाळी पाऊस, समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि शेतीवरील परिणाम यामुळे प्रत्येक देश चिंतेत आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जेकडे वळण्याचा जागतिक कल वाढत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि विद्युत वाहनांसह ग्रीन हायड्रोजनला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतासाठी ग्रीन हायड्रोजनचे महत्त्व अधिक आहे. कारण देशाच्या ऊर्जा गरजा सातत्याने वाढत आहेत. भारत जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा ग्राहकांपैकी एक असून तेलाच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमतीतील चढउतारांचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. रशिया-युक्रेन युद्धानंतर ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व जगासमोर नव्याने अधोरेखित झाले. अनेक देशांनी स्वदेशी आणि स्वच्छ ऊर्जा स्त्रोतांच्या विकासाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली. भारतानेही राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियानाच्या माध्यमातून या क्षेत्रात महत्त्वाकांक्षी पावले उचलली आहेत. अशा वेळी आयआयटी गुवाहाटीच्या संशोधकांचे यश विशेष महत्त्वाचे ठरते. ग्रीन हायड्रोजन निर्मितीतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे उत्पादनाचा खर्च आणि कार्यक्षमता. विद्यमान तंत्रज्ञान अजूनही तुलनेने महाग आहे.

## कर्जमाफी अटी - शर्ती विरोधात...

पान १ वरून - मायक्रोफायनान्स कर्जही माफ करावे अशा मागण्या यावेळी किसान सभेच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

किसान सभेचे शिष्टमंडळ दिनांक १२ जून रोजी यासंदर्भात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची पुणे येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कार्यालयात भेट घेणार असून याबाबतची आपले आक्षेप त्यांच्यासमोर मांडणार आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास आणखीन आंदोलन तीव्र करण्याचा इशारा डॉ. अशोक ढवळे, जे पी गावीत, डॉ. अजित नवले, उमेश देशमुख यांनी दिला आहे.

## संगमनेरातील सराईत गुन्हेगार...

पान १ वरून - पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या सूचनेनुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत व त्यांच्या पथकाने केली.

दरम्यान, संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इतर सराईत गुन्हेगारांविरुद्धही एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये धाक निर्माण झाला असून शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# डॉ. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगम सेवाभावी ट्रस्ट संचलित डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षांमध्ये शाळा व ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता दहावीमध्ये कु. सृष्टी दत्तात्रय दिघे व कु. श्रुती सुनिल सानप यांनी ९६ टक्के गुण मिळवत संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. कु. स्नेहा जयराम वाकळे व कु. स्नेहल सुहास मोरे यांनी ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त केला, तर कु. प्रांजल धोंडू गोडे हिने ९५ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

ज्युनिअर कॉलेजमध्ये कु. सायली अमोघ कुलकर्णी हिने ९२.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. कु. स्वयम अशोक हांडे याने ८८.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. अनुष्का सचिन चांडक हिने ८० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

याचबरोबर ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु. सायली



अमोघ कुलकर्णी हिने प्रतिष्ठित गएए अर्वींरपलशव परीक्षेत ऑल इंडिया रँक ११२८ प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच विद्यार्थी मोहित संजय सोलंके याने ऑल इंडिया रँक २९२० मिळवत डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. अंकिता डेरे मॅडम उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. दहावीमध्ये ९६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या कु. सृष्टी दत्तात्रय दिघे व कु. श्रुती सुनिल सानप यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या परंपरेनुसार संचालिका मा. सौ. अंकिता डेरे मॅडम यांच्या हस्ते या दोन्ही विद्यार्थिनींना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन करून गौरविण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कृषीकन्या शेतकऱ्यांच्या बांधावर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील खांजापुर येथे मालदाड येथील श्रमशक्ती कृषि महाविद्यालयाच्या कृषीकन्यांचे आगमन झाले असून ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक (ठअथए । अखअ) कार्यक्रमाच्या माध्यमातून ह्या कृषीकन्या गावामध्ये वास्तव्यास राहून शेतकरी व ग्रामीण भागाशी प्रत्यक्ष संवाद साधत कृषीविषयक मार्गदर्शन करणार आहेत. सेवा संस्कार संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या श्रमशक्ती कृषि महाविद्यालय, मालदाड येथील विद्यार्थीनी शिक्षण घेत असून संस्थेचे अध्यक्ष साहेबराव नवले पाटील यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश साकोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

कार्यक्रम समन्वयक प्रा. निलेश तायडे सर व कार्यक्रम अधिकारी प्रा. गुंजाळ मॅडम आणि सर्व विषय विशेषज्ञ यांच्या सूचनेनुसार कृषीकन्या स्वामिनी सुर्यवंशी, पुजा नवले, सानिका देठे, संस्कृती सातपुते ,वासंती थिटे व सृष्टी शेवाळे ह्या खांजापुर गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांच्या समस्या, अनुभव व शेतीपद्धती जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून ह्या कृषीकन्या शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीज प्रक्रिया, गांडूळ खत निर्मिती, चारा पिके, फळबाग व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, आधुनिक सिंचन पद्धती, बायोगॅस आदी विषयांवर माहिती व मार्गदर्शन देणार आहेत.

यावेळी खांजापुर गावचे सरपंच श्री.तुषार सातपुते , ग्रामसेवक श्रीमती वायकर मॅडम, ग्रामपंचायत कर्मचारी श्री.भगवान साळवे, प्रगतशील शेतकरी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचे जल्लोषात स्वागत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ८ जून २०२६ रोजी जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात आनंददायी आणि चैतन्यमय वातावरणात करण्यात आली. उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा शाळेत येण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. मित्र-मैत्रिणींना भेटण्याची, नवीन वर्गात प्रवेश करण्याची आणि नव्या शैक्षणिक प्रवासाला सुरुवात करण्याची उत्सुकता विद्यार्थ्यांमध्ये पाहायला मिळाली.



शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचे मिठाई व औक्षण करून उत्साहात स्वागत करण्यात आले. पूर्व प्राथमिक विभागाच्या चिमुकल्यांसाठी दीक्षाग्रहण हा उपक्रम राबविण्मात आला. मिकी माऊससोबत खेळताना, संवाद साधताना मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ, बडबडगीते तसेच मनोरंजक उपक्रम आयोजन करण्यात आले होते. प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण व्हावी आणि शाळेची गोडी वाढावी यासाठी समूहखेळ, मैदानी खेळ, बौद्धिक खेळ, गाणी, गोष्टी, चित्रकला, हस्तकला तसेच व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या सुट्टीतील अनुभव जाणून घेतले. तसेच नवीन शैक्षणिक वर्षातील उद्दिष्टे, अभ्यासक्रम आणि विविध स्पर्धात्मक उपक्रमांची माहिती दिली. संपूर्ण शाळा विद्यार्थ्यांच्या हास्याने, आनंदाने आणि उत्साहाने बहरून गेली होती. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिक्षकांचे प्रेमळ मार्गदर्शन आणि शाळेतील सकारात्मक वातावरणामुळे शाळेचा पहिला दिवस सर्वांसाठीच अविस्मरणीय ठरला.

मे महिन्याच्या सुट्टीनंतर जिजामाता स्कूलमध्ये झालेल्या या उत्साहवर्धक प्रारंभामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षासाठी सर्वजण उत्सुक असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियानास सुरुवात

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियान राबविण्यात येत असून, जिल्ह्यात ग्रामपंचायती, पंचायत समित्या तसेच संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून सर्वेक्षण व नोंदणीचे काम सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगारांनी आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय, संबंधित पंचायत समिती अथवा सर्वेक्षण पथकाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

दि. २१ सप्टेंबर २०२१ व दि. ३१ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयांतील तरतुदींनुसार लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी स्मार्ट सर्विसेस प्रा. लि., पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र, ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र तसेच रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणी केल्यानंतर ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार असून त्यांना अधिकृत ओळखपत्र उपलब्ध होणार आहे. तसेच भविष्यातील विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविणे अधिक सोपे होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वयक महेश आढाव यांच्याशी ९९२३१९५५२७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.


**हॉटेल अन्नपूर्णासाठी पाहिजेत**
स्वादिष्ट नाष्टा आणि जेवण नवायला कुक पाहिजे
आकर्षक पगार मिळेल
9011326117
7588004655

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
SAMINA TOFIK BAGWAN
TO NEW NAME AS
SAMINA SHAHABUDDIN BAGWAN
UIDAI 921583818148
ADRESS-BAGWAN MALA, SANGAMNER KHURD SANGAMNER 422605

**पाहिजेत**
सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क - 9822258458

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**घर विक्रीसाठी आहे**
अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**कामगार भरती**
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

**जागा भाड्याने देणे**
३ मजली
८०० स्क्वेफूट
ठिकाण - मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६







# लोकसभेच्या जागा ८२४ पर्यंत वाढवा

## 170 मतदारसंघांच्या विभाजनाचा प्रस्ताव

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने' लोकसभेची सदस्यसंख्या ८२४ जागांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. केवळ लोकसंख्येचा विचार न करता मतदारसंघ दोन किंवा तीन भागांत विभागण्यासाठी बहु-घटकीय निकषांचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता मतदानाचा टक्का, मतदारसंघाचा आकार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची लोकसंख्या, भाषिक विविधता आणि ध्रुवीकरण यांसारख्या बहु-घटकीय निकषांचा वापर करून मतदारसंघांचे विभाजन केले जावे, अशी शिफारस करण्यात आली आहे.लोकसभेच्या जागा वाढवताना मोठ्या राज्यांच्या जागा ५० टक्के वाढवल्या जाव्यात. नवीन मॉडेलनुसार सर्व मोठ्या राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये ५० टक्के वाढ होणार आहे. केरळच्या जागा २० वरून ३०, तामिळनाडूच्या ३९ वरून ५९, तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून थेट १२० होणार आहे. तर, लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जागा दुप्पट करण्याची शिफारस केली गेलीय.

दक्षिण विरुद्ध उत्तर भारत संतुलन साधण्याचा प्रयत्न देखील करण्यात येणारआहे. या मॉडेलमुळे दक्षिण भारतातील राज्यांचा लोकसभेतील वाटा २३.६ टक्के (सध्या२३.७ टक्के) तर उत्तर भारतातील ६ प्रमुख राज्यांचा वाटा ४५.२ टक्के (सध्या ४५.६%) राहील, ज्यामुळे प्रादेशिक संतुलन राखले जाईल. मतदारसंघांचे योग्य विभाजन केल्यास आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत २.३ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.२००९ ते २०२४ दरम्यानच्या लोकसभा निवडणुकांच्या डेटाचा अभ्यास करून हा अहवाल तयार करण्यात आला आहे. लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता मतदानाचा टक्का, मतदारसंघाचा आकार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची लोकसंख्या, भाषिक विविधता आणि ध्रुवीकरण यांसारख्या बहु-घटकीय निकषांचा वापर करून मतदारसंघांचे विभाजन केले जावे. विद्यमान ५४३ जागांपैकी एकूण १७० मतदारसंघांचे विभाजन करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# यश मिळवा; पण त्याचा आनंदही घ्या : इंद्रजीत देशमुख

## प. पू. गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहातील व्याख्यानात जीवनमूल्यांवर मार्गदर्शन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -यश,संपत्ती आणि प्रसिद्धी मिळविण्याच्या धडपडीत माणूस स्वत:चे आरोग्य, नातेसंबंध आणि आनंद हरवून बसतो. एव्हरेस्टसारखी यशाची शिखरे सर केली तरी आयुष्याच्या प्रवासात माणूस एकटा राहता कामा नये. यशाबरोबर आयुष्याचा उत्सव साजरा करता आला पाहिजे असे प्रतिपादन निवृत्त आयएएस अधिकारी व नाम फाऊंडेशनचे व्याख्याते इंद्रजीत देशमुख (काका) यांनी केले.



पूज्य गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संजय पाटणकर यांच्या हस्ते इंद्रजीत देशमुख यांचे स्वागत करण्यात आले. ईश्वरनिष्ठ संतांच्या मांदियाळीत सप्ताहाची सुरुवात होत असल्याचे सांगत त्यांनी संत परंपरेचे समाजजीवनातील महत्त्व अधोरेखित केले.

मानवी जीवनातील चार आश्रम व्यवस्थेचे महत्त्व विशद करताना त्यांनी सांगितले की, पूर्वी माणूस दीर्घायुषी होता कारण त्याचे जीवन निसर्गाशी सुसंगत होते. निसर्गाने निर्माण केलेल्या व्यवस्थेचा आदर करून जीवन जगणे आवश्यक आहे. मानवाच्या अंगी आठ प्रकारच्या बुद्धिमत्ता दडलेल्या असून त्या ओळखून विकसित करण्याची गरज आहे. आज आपण समृद्ध झालो आहोत; मात्र मिळवलेली शक्ती, ज्ञान आणि संस्कार पुढील पिढीकडे हस्तांतरित करणे हेच खरे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. संतांनी समाजात चांगुलपणा रुजावा म्हणून सप्ताह, पारायण आणि कीर्तनाची परंपरा निर्माण केली. पारायणामुळे मनुष्य अंतर्बाह्य पवित्र होतो, तर ज्ञानेश्वरी म्हणजे माऊलींचा ज्ञानस्पर्श असल्याचे त्यांनी सांगितले. संत मंडळींनी समाजाला ज्ञानरूपी यज्ञाकडे नेण्याचे काम केले असून संत हे संसाराला शीतल सावली देणारे वटवृक्ष असल्याचेही ते म्हणाले.

जीवनातील यशस्वी संसाराची सूत्रे उलगडताना त्यांनी उत्तम आरोग्य हा माणसाचा सर्वात मौल्यवान दागिना असल्याचे सांगितले. धन शुद्ध मार्गाने आणि उत्तम व्यवहाराने मिळविलेले असावे, घरात अवदसा नसावी, पत्नी प्रेमळ व गोड बोलणारी असावी, पुत्र आज्ञाधारक व कर्तृत्ववान असावा आणि वडीलही त्या योग्यतेचे असावेत असे त्यांनी स्पष्ट केले. ज्या क्षेत्रात कार्य करतो त्या क्षेत्राचे सखोल ज्ञान असणे अत्यावश्यक असल्याचेही आवर्जून सांगितले. आजचा माणूस पैसा, लौकिक, आनंद आणि सुखाच्या शोधात धावत असताना शरीरस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची खंत व्यक्त करून त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा दाखला दिला. यश मिळविणे महत्त्वाचे आहेच, पण त्या यशाचा आनंद घेता आला पाहिजे. आयुष्याचा प्रत्येक क्षण उत्सवासारखा जगता आला पाहिजे असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला.

# 'ध्रुव' च्या योगासनपटूंची सुवर्ण कामगिरी

## जागतिक मंचावर संगमनेरची झेप, ११ सुवर्ण पदकांची कमाई



**या जागतिक योगासन स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे दूरदर्शनवरुन झालेले त्याचे थेट प्रसारण. या सोहळ्यात भारताचे प्रतिनिधित्व करताना ध्रुव ग्लोबल स्कूलच्या प्रांजल व्हन्ना आणि तृप्ती डोंगरे यांनी सादर केलेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांसह जगभरातील प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या जागतिक स्पर्धांचे डी.डी.स्पोर्टस् चॅनलवर प्रभावी समालोचन करुन जागतिक योगप्रेमींना खिळवून ठेवण्याची जबाबदारी 'वर्ल्ड योगासना'चे उपाध्यक्ष आणि ध्रुव ग्लोबल स्कूलचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी यांनी अतिशय कुशलतेने पार पाडली. त्यांची अभ्यासपूर्ण वाणी आणि योगासनांविषयीची सखोल माहिती यामुळे या स्पर्धेला एक वेगळीच उंची प्राप्त झाली होती.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असलेल्या योगासनाने जागतिक क्रीडा क्षेत्रात नवा इतिहास घडवला आहे. अहमदाबाद येथील ट्रान्सस्टेडियामध्ये पार पडलेल्या पहिल्याच विश्व योगासन 'अजिंक्यपद स्पर्धेत' भारताने या खेळावरील आपले एकतर्फी वर्चस्व सिद्ध करताना सुवर्णमय विजय संपादन केला आहे. वर्ल्ड योगासनने आयोजित केलेल्या या क्रीडा महाकुंभात जगातील ७९ देशांमधील ५८७ योगासनपटूमध्ये भारताने १०२ सुवर्ण पदकांसह ११४ पदकांची लयलूट केली. या स्पर्धेत जपानने उपविजेतेपद पटकावले, अर्जेंटिनाला तिसर्यास्थानावर तर, सिंगापूर आणि नेपाळला उत्तेजनार्थ पारितोषिकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत देशाचे प्रतिनिधीत्व करणार्या ध्रुव ग्लोबलच्या सहा योगासनपटूंनी चित्तथरारक सादरीकरणाच्या बळावर उपस्थित हजारों प्रेक्षकांची मने जिंकताना तब्बल ११ सुवर्ण पदके पटकावली.

गुजरातमधील अहमदाबादेत झालेल्या या पहिल्याच वैश्विक स्पर्धेतील भारतीय योगासन संघाच्या ऐतिहासिक विजयात महाराष्ट्राचा आणि विशेषतः संगमनेरच्या 'ध्रुव ग्लोबल स्कूल'चा वाटा मोलाचा ठरला. भारतीय संघात समाविष्ट असलेल्या १२५ खेळाडूंमध्ये सर्वाधिक २३ खेळाडू एकट्या महाराष्ट्रातील होते. त्यातही ध्रुव ग्लोबल स्कूलच्या सहा योगासनपटूंनी जागतिक मंचावर भारताचा झेंडा रोवला. रोहन तायडे, तृप्ती डोंगरे, रुद्रांक्षी भावे, प्रांजल व्हन्ना आणि हिंदवी चौरे यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके, तर प्रणव साहुने एक सुवर्णपदक मिळवून वैयक्तिक कौशल्याचा उच्चांक गाठला. एकूण ११ सुवर्णपदके मिळवून या विद्यार्थ्यांनी भारतीय विजयाला धार चढवली. या यशामागे मंगेश खोपकर, विष्णू चक्रवर्ती, मृणाली बाणाईत, ऋषभ शर्मा व शुभम शर्मा या प्रशिक्षकांचे परिश्रम आणि मार्गदर्शन कारणीभूत होते.

चार दिवस चाललेली ही स्पर्धा १० ते ५५ वयोगटांतील सहा वेगवेगळ्या गटांत विभागली होती, ज्यात १२ क्रीडा प्रकारांसह ११५ इव्हेंट्स घेण्यात आले. तंत्रशुद्धता, लवचिकता, स्थिरता आणि एकाग्रतेचा सुरेख मिलाफ या स्पर्धेत दिसून आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हर्च्युअल आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह योगऋषी स्वामी रामदेव, डॉ.जयदीप आर्य व उदित सेठ यांच्या उपस्थितीत रंगलेल्या या स्पर्धेने योगासनांचा जागतिक खेळाचा दर्जा अधिक बळकट केला आहे.

या सुवर्ण यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हाईस चेअरमन गिरीश मालपाणी आणि प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी विजेत्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणार्या प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे. हे यश केवळ एका शाळेचे नसून भारताच्या योग संस्कृतीचा जागतिक विजय असल्याची भावनाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ॲसिड...

पान १ वरून -

यावेळी त्यांनी वडगाव पान येथील अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या सिड हल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला. या घटनेला दोन महिने उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती लागलेला नसल्याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. या प्रकरणाच्या तपासाला गती देऊन आरोपीचा तातडीने शोध घेण्यात यावा आणि पीडित मुलीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

याचबरोबर त्यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचीही भेट घेतली. या भेटीत विविध सामाजिक आणि प्रशासकीय विषयांवर चर्चा करण्यात आली. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून त्यासाठी प्रशासनाबरोबरच समाजानेही संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने पुढे येण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांची सुरक्षितता आणि त्यांना न्याय मिळवून देणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी जागरूकता, संवेदनशीलता आणि ठोस कृतीची आवश्यकता आहे असेही डॉ.जयश्रीताई थोरात यांनी यावेळी सांगितले.


**पाहिजेत**

**इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत**

| | |
|---|---|
| अकाऊंटट –३ | क्लार्क –३ |
| ड्रायव्हर–३ | वॉचमन– ३ |

तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
Sangle Shekhar Sanjay

**NEW NAME AS**
Shekhar Sanjay Sangale

ADD - SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
DNYANESHWAR DAMODAR AROTE

**TO NEW NAME**
DNYANESHWAR DAMODHAR AROTE

BY AFFIDAVIT NO 928/2026
DATE 10/06/2026

ADD- FLAT NO.8, GOKULDHAM APRT.LANE 4 A,SARAF NAGAR, WADALA PATHARDI ROAD, NASHIK, NASHIK CITY, MAHARASHTRAPIN NO.422009

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
VILAS BHASKARRAO DAROLE

**TO NEW NAME**
VILAS BHASKAR DAROLE

BY AFFIDAVIT NO 929/2026
DATE 11/06/2026

ADD- NALADA,COLLEGE ROAD, SUVIDHA HOUSING SOCIETY, SANGAMNER -422605


# शंकर काशिद यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील रहिवासी व संगमनेर तालुका फोटोग्राफर व व्हिडिओग्राफर संघटनेचे सभासद योगेश काशीद यांचे वडील शंकर तानाजी काशीद यांचे बुधवार दि. १० जून २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर वडगावपान येथील अमरधाममध्ये गुरुवार दि. ११ जून रोजी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. शंकर काशिद यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# राज्यात पुन्हा ऑपरेशन टायगर ?

## ठाकरेंचे ७ खासदार शिंदेंच्या संपर्कात ?

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा शिवसेनेच्या ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काही दिवसांपूर्वी दिल्ली दौऱ्यावर होते. या दौऱ्यात ठाकरेंच्या शिवसेनेच्या सात खासदारांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याची चर्चा आहे. यातील एका खासदाराला केंद्रात मंत्रिपद तर इतरांनाही मानाची पदं देण्याची ऑफर शिंदेंना दिल्याचं बोललं जातं आहे. विशेष म्हणजे आपल्या खासदारांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप ठाकरेंच्या पक्षाचे माजी खासदार विनायक राऊतांनी केला आहे.



२०२४मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या पक्षांचे नऊ खासदार विजयी झाले होते. दक्षिण मंबईतून अरविंद सावंत, दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, धाराशिवमधून ओमराजे निंबाळकर,यवतमाळ वाशिममधून संजय देशमुख,हिंगोलीतून नागेश पाटील आष्टीकर, परभणीतून संजय जाधव,नाशिकमधून राजाभाऊ वाझे,शिर्डीतून भाऊसाहेब वाकचौरे, उत्तर पूर्व मुंबईतून संजय दिना पाटील हे विजयी झाले होते. दरम्यान काही दिवसांपूर्वी शिर्डीत झालेल्या ठाकरेंच्या पक्षाच्या मेळाव्याला खासदार भाऊसाहेब वाकचौरेंनी दांडी मारली होतीअशातच आता ऑपरेशन टायगरच्या चर्चा सुरू असतानाच वाकचौरेंनी याबाबत काहीही बोलणं टाळलं आहे.ठाकरेंच्या शिवसेनेच्या खासदारांबाबत यापूर्वीही अशाच चर्चा झाल्या होत्या. विशेष म्हणजे एप्रिल महिन्यात शिवसेनेचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाला खासदार नागेश आष्टीकर आणि खासदार संजय देशमुखांनी हजेरी लावली. तर मुंबईत संजय दिना पाटील यांच्यासोबत एकनाथ शिंदेंनी एकाच कारमधून प्रवास केला होता. या सर्व घटनांची चर्चामुळं या जवळीकीला बळ मिळालं आहे. अशातच ठाकरेंच्या शिवसेनेनं आपले खासदार कुणाच्याही संपर्कात नसल्याचा दावा केलाय. तर शिंदेंच्या शिवसेनेनं या चर्चांबाबत सावध प्रतिक्रिया दिली आहे.

साई संस्थाननात मुख्य कार्यकारी अधिकारी असताना वाकचौरे यांना खैरे स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे घेऊन गेले. त्यानंतर त्यांना शिर्डीतून शिवसेनेची उमेदवारी मिळाली. ते भाजपप्रणित 'एनडीए'तील शिवसेनेचे खासदार म्हणून दिल्लीत गेले. जिल्ह्यात त्यांचे आणि तत्कालीन माजी खासदार स्व. बाळासाहेब विखे पाटील आणि नंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे अतिशय जवळचे संबंध आहेत. ते त्यांनी कधीही लपवून ठेवले नाहीत. शिवसेनेचे खासदार असताना

त्यांनी त्यावेळी कॉंग्रेसमध्ये असलेल्या स्व. विखे पाटील यांच्यासोबत दुष्काळी भागाचे दौरे करून खळबळ उडवून दिली होती. त्यांच्या आग्रहावरून त्यांनी त्यावेळच्या शिवसेनेला सोडचिठ्ठी दिली. कॉंग्रेसकडून उमेदवारी मिळवली. दुर्दैव असे की, २०१४ साली मोदी लाट आली. त्या लाटेत ते पराभूत झाले. पुढे विखे परिवार भाजपवासी झाला. ते पुन्हा भाजपवासी झाले. मागील निवडणुकीत शिवसेनेने त्यांना पुन्हा उमेदवारी दिली. त्यात ते खासदार झाले. राजकीय परिस्थिती पुरती बदलल्याने आता त्यांना पुन्हा 'एनडीए'त जाण्याचे वेध लागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्यांची भाजप आणि शिवसेनेच्या (शिंद गट) नेत्यांसोबत जवळीक वाढली. ते मुंबईत आणि दिल्लीत जाऊन कामाच्या निमित्ताने या नेत्यांच्या भेटी घेतात. नेते साईदर्शनासाठी येथे आले की, आवर्जून उपस्थित असतात, वर्षभरापूर्वी भाजपच्या एका कार्यक्रमात ते थेट पालकमंत्री विखे पाटील यांच्या शेजारच्या खुर्चीवर विराजमान झाले होते.

# राजकारण्यांच्या डोक्यावर नेहमी टांगती तलवार

## समाजसेवेसाठीच त्यांचे जीवन : शालिनीताई विखे पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - प्रत्येक माणूस स्वतःच्या आयुष्यासाठी जगत असतो, मात्र राजकारणी व्यक्तीचे जीवन हे समाजाच्या सेवेसाठी समर्पित असते. समाजातील विविध प्रश्न, जनतेच्या अपेक्षा आणि जबाबदाऱ्या यामुळे राजकारण्यांच्या डोक्यावर नेहमीच टांगती तलवार असते, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन, आश्वी खुर्द येथील उपशिक्षिका मंगलताई कौतिक तांबे (थेटे मॅडम) यांच्या सेवापूर्ती समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य आणासाहेब भोसले होते.

यावेळी कारखान्याचे माजी चेअरमन कैलास तांबे, तहसीलदार आबासाहेब तांबे, चेअरमन मकरंद गुणे, माजी संचालक डॉ. दिनकर गायकवाड, प्रतापराव तांबे, संचालक ॲड. अनिल भोसले, सुनील तांबे, गोरक्षनाथ तांबे, विजयराव चतुरे, अजयराव ब्रम्हणे, हिराबाई पाटोळे, लिलावती सरोदे, प्राचार्य सयराम शेळके, प्राचार्य संजय शेळके, भाऊसाहेब लावरे, कौतिक तांबे, प्रतिक तांबे, सोनल तांबे, तेजस तांबे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या की, मंगलताई तांबे यांनी तब्बल ३५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य केले आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी आपल्या सेवाकाळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी शैक्षणिक कार्याबरोबरच संस्कारांची जोपासना करण्याचेही कार्य केले.

त्या पुढे म्हणाल्या की, घरात एक व्यक्ती जरी सुशिक्षित असली तरी त्याचा सकारात्मक



**३५ वर्षांहून अधिक काळ शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करत असताना शाळेतील सहकारी शिक्षक, माहेर, सासर आणि नातेवाईकांचे मोलाचे सहकार्य लाभले. माणसामध्ये उपयोगितेची मूल्ये असली पाहिजेत आणि ती जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.**

**मंगलताई कौतिक तांबे, सेवानिवृत्त उपशिक्षिका**

परिणाम संपूर्ण कुटुंबावर आणि समाजावर दिसून येतो. सेवानिवृत्त मुख्याध्यापक कौतिक तांबे आणि सेवानिवृत्त उपशिक्षिका मंगलताई तांबे यांनी आपल्या कुटुंबात शिक्षण, संस्कार आणि मूल्यांची परंपरा जोपासून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. सेवाकाळात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडवून त्यांच्या आयुष्याला दिशा देण्याचे मोलाचे कार्य केल्याचेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी सिंधूताई थेटे यांचा सत्कार माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तांबे परिवाराने आईविषयी कृतज्ञता व्यक्त करत ऋणनिर्देश केला. कार्यक्रमाच्या शेवटी मंगलताई तांबे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य संजय उंबरकर व शांताराम तांबे यांनी केले, तर आभार प्रा. संजय देशमुख यांनी मानले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
ताम्हाणे हॉस्पिटल
अधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



CorelDRAW Ps Ai Id
पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005





भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# दुचाकीवरील स्फोटकांचा भीषण स्फोट; एक गंभीर

## अकोले तालुक्यात खळबळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोल - अकोले तालुक्यातील औरंगपूर फाटा येथे बुधवारी दुपारी दुचाकीवरून वाहतूक करण्यात येणाऱ्या स्फोटक पदार्थांचा अचानक भीषण स्फोट झाल्याने एक जण गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप उत्तम ताजने (रा. औरंगपूर) हे दुचाकीवरून स्फोटक पदार्थ घेऊन जात असताना औरंगपूर फाट्याजवळ अचानक स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की दुचाकी हवेत उडाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. स्फोटानंतर परिसरात धुराचे लोट पसरले होते.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्फोटाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक येथील बॉम्ब शोध व नाश पथक तसेच फॉरेन्सिक विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून तपासासाठी आवश्यक नमुने संकलित केले आहेत.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून स्फोटकांचा स्त्रोत, त्यातील रसायने आणि इतर संबंधित बाबींचा सखोल तपास सुरू आहे. पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात संबंधित व्यक्ती बेकायदेशीर मासेमारीसाठी या स्फोटकांचा वापर करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# अमोल खताळांच्या पाठपुराव्याने वीजसेवेला बळ

## ७०० हून अधिक रोहित्रे बदलून शेतकऱ्यांना दिलासा



**संगमनेर तालुक्यातील राजापूर, जवळेकडलग, धांदरफळ खुर्द, कर्जुले पठार, मांडवे, तळेगाव, हिवरगाव पावसा आदी भागांतील वीज उपकेंद्रांची क्षमता अपुरी असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच वाढत्या वीज मागणी मुळे तांत्रिक अडचणी निर्माण होत होत्या. ही बाब लक्षात घेऊन आमदार अमोल खताळ यांनी महावितरणकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संबंधित वीज उपकेंद्रांच्या क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील वीज खंडित होण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे.**

**आमदार अमोल खताळ, संगमनेर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वीज वितरण व्यवस्थेत गेल्या दीड वर्षात लक्षणीय सुधारणा झाली असून जळालेले वीज रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बदलण्याच्या प्रक्रियेला अभूतपूर्व गती मिळाली आहे.तालुक्यात सुमारे ७ हजार ५०० वीज रोहित्र आहेत. उन्हाळ्यातील तीव्र उष्णता, वाढलेला वीजभार आणि इतर तांत्रिक कारणांमुळे दरवर्षी सरासरी ७०० ते ८०० रोहित्र जळाल्याच्या घटना घडल्या आहेत मात्र आमदार अमोल खताळ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्या कडून एक रुपयाही न घेता अवघ्या तीन ते चार दिवसात विजेचे रोहित्र बसून मिळत असल्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला असून शेतीपंपांच्या वीजपुरवठ्यातील अडथळे कमी होण्यास मदत झाली आहे.

यापूर्वीच्या काळात जळालेले वीज रोहित्र जळाल्यानंतर नवीन रोहित्र बसविण्यासाठी शेतकऱ्याकडून २० ते २५ हजार रुपयांची वर्गणी गोळा केली जात होती. एवढी रक्कम जमा करूनही नवीन रोहित्र मिळण्यासाठी २० ते २५ दिवसांचा कालावधी लागत असे. परिणामी शेतीची कामे ठप्प होत असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते.मात्र, तालुक्यात परिवर्तन झाल्यानंतर गेल्या दीड वर्षात फार मोठा बदल झाला आहे. आमदार अमोल खताळ यांचा महा वितरण प्रशासनाशी सातत्याने केलेल्या समन्वयामुळे जळालेले रोहित्र बदलण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. आता शेतकऱ्यांकडून एक रुपयाही न घेता निशुल्क अवघ्या ३ ते ४ दिवसांत नवीन रोहित्र उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतीपंपांचा वीज पुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होत आहे.

दरम्यान, तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम करण्यासाठीही विविध उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नांतून संपूर्ण तालुक्यात १६५ नवीन वीज रोहित्रांची उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय आमदार निधीतून आणखी २४ नवीन रोहित्र बसविण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक गावांमधील कमी दाबाचा व ओव्हरलोडचा प्रश्न सोडविण्यास मदत झाली आहे.

तसेच आरटीएसपी योजनेअंतर्गत आणखी ९ वीज रोहित्र बसविण्याच्या कामांना मंजुरी मिळाली असून ही कामेही लवकरच पूर्णत्वास जाणार आहेत. वीज पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी आतापर्यंत तालुक्यात सुमारे एक कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. यामुळे भविष्यातील वाढत्या वीज मागणीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# ॲसिड...

पान १ वरून -

यावेळी त्यांनी वडगाव पान येथील अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या सिड हल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला. या घटनेला दोन महिने उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती लागलेला नसल्याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. या प्रकरणाच्या तपासाला गती देऊन आरोपीचा तातडीने शोध घेण्यात यावा आणि पीडित मुलीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

याचबरोबर त्यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचीही भेट घेतली. या भेटीत विविध सामाजिक आणि प्रशासकीय विषयांवर चर्चा करण्यात आली. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून त्यासाठी प्रशासनाबरोबरच समाजानेही संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने पुढे येण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांची सुरक्षितता आणि त्यांना न्याय मिळवून देणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# संगमनेरजवळ अर्धवट जळालेल्या अवस्थेत अज्ञात इसमाचा मृतदेह



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहराजवळून जाणाऱ्या नाशिक-पुणे महामार्गावरील हिवरगाव टोलनाक्याजवळील आडवाओढा परिसरात बुधवारी सायंकाळी एका अज्ञात इसमाचा अर्धवट कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या धक्कादायक घटनेमुळे मृत्यूचे नेमके कारण काय, याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिवरगाव टोलनाक्याच्या अलीकडे असलेल्या एका हॉटेलजवळ रस्त्याच्या कडेला संशयास्पद परिस्थितीत एक मृतदेह पडलेला असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. जवळ जाऊन पाहिले असता मृतदेह अर्धवट कुजलेल्या अवस्थेत असल्याचे आढळून आले.

घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह संगमनेर येथील कॉटेज हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आला.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहे. सदर इसमाचा मृत्यू ५ -६ दिवस आधी झाल्याचे शवविच्छेदनात समोर आले आहे. इतर तांत्रिक तपासणीनंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती तपासी अधिकाऱ्यांनी दिली. मात्र महामार्गालगत अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने हा नैसर्गिक मृत्यू, अपघात की घातपात, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605



चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25